राज्य शासकीय व जिल्हा परिषद कार्यालयातील
वाहनचालकांना टेरिकॉट गणवेष पुरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. सीएलओ-१०८२/११२१/२१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि. २५ सप्टेंबर १९९१.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएलओ- १०७०/एक्साएल, दिनांक ५-१०-७०.

शासन निर्णय :-

शासकीय कार्यालयातील वाहनचालकांना गणवेष विहित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या संदर्भात शासनाने आता निर्णय घेतला आहे कीं, शासकीय कार्यालयातील वाहन चालकांच्या गणवेषामध्ये सफारी टाईप बुश-शर्टस, फूलपॅटस पीक कॅप[टोपी], काळे बूट व पायमोजे यांचा समावेश असावा व त्यासाठी त्यांना गणवेश खरेदी करण्यासाठी[शिलाईसह] दोन वर्षातून एकदा रु. ८००/-[रु. आठशे फक्त] एवढी रक्कम मंजूर करण्यात यावी. या रकमेतून वाहनचालक दोन वर्षातून एकदा, दोन सफारी टाईप बुशशर्टस्, दोन फुलपॅटस्, एक पीक कॅप [टोपी] पायमोजे[ऐक जोड]व काळे बूट खरेदी करतील.

२/ सर्वसाधारणपणे शासकीय कार्यालयातील वाहनचालकांचा गणवेश "सफेद"रंगाचा राहील. तथापी सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग वा अन्य विभागांच्या अधिपत्त्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील वाहनचालकांना त्यांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन सफेद रंगाव्यतिरिक्त अन्य विशिष्ट रंगाचा गणवेश विहित करण्याबाबतचे आदेश आवश्यकतेनुसार संबंधित विभाग काढतील.

३/ वाहनचालकांच्या गणवेषासाठी होणारा खर्च संबधित विभागांनी/कार्यालयानी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावयाचा आहे.

४/ महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१[सन १९६१ चा अधिनियम क्र. ५] च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे कीं, हे आदेश जिल्हा परिषदातील वाहनचालकांच्या गणवेषासाठी लागू राहतील. मात्र त्यासंबंधित खर्च संबधित जिल्हा परिषदानी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

Tahasildar Office Khed
Date 2 - OCT 1991
Came

५/ हे आदेश वित्त विभागाच्या सहमताने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२-१/व्यय-४, दिनांक १६-९-९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही :

उपसचिव, महाराष्ट्र राज्य.

Tahsildar, Khed

००००००

क्रमांक. ससाशा/बांधकाम/कावि/१३५३.

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी, दि. १६-१०-१९९१.

प्रत :

उपविभागीय अधिकारी [सर्व], तहसीलदार [सर्व ] यांकडे माहितीसाठी व पुढाल कार्यवाहीसाठी रवाना.

२/- वाहन चालक यांना गणवेष घेण्याबाबत सूचना द्याव्यात. वाहनचालक यांनी गणवेष खरेदी केल्यावर त्यांना रक्कम अदा करावी. सदरचा खर्च कार्यालयीन खर्चातून करण्यात यावा.

प्रतिलिपी : अनौपचारिक संदर्भाने लेखा शाखेकडे

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता.